**Newspaper: Maharashtra Times**

**Article Date: 24th July, 2019**

**Article regarding 51st Youth Festival Celebrations**



मुंबई विद्यापीठाच्या ५१व्या युवा महोत्सवाचा बक्षीस समारंभ सोहळा मंगळवारी संध्याकाळी मोठ्या दिमाखात पार पडला. विद्यापीठाच्या फोर्ट परिसरातील पदवीदान सभागृहात रंगलेल्या या कार्यक्रमात पोदार कॉलेजने 'सर्वसाधारण विजेतपद' मिळवत 'मटा' करंडकावर सलग तिसऱ्यांदा नाव कोरले. यावेळी सोहळ्याची मुख्य अतिथी अभिनेत्री भाग्यश्री हिच्या हस्ते हा करंडक पोदार कॉलेजला प्रदान करण्यात आला. यावेळी विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. सुनील पाटील, विद्यापीठाचे सांस्कृतिक समन्वयक नीलेश सावे तसेच पोदार कॉलेजच्या प्राचार्या शोभना वासुदेवन आणि प्रा. वृषाली कानेरी उपस्थित होत्या.